G:\General correspondence /General Correspondence Letter (Win10) YPS


**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Aurangabad – 431 004, Maharashtra, India
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)


संदर्भ क्र. : शैक्ष/ संलग्न/वायएसपी/२०२०-२१/ 19453-61 दिनांक:- ०८-१०-२०२०. 12

**प्रति,**
**अध्यक्ष / सचिव,**
भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित,
स्वा. सावरकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड,
जि. बीड.

**विषय :- जून २०२० पासुन एम.एस्सी. रसायनशास्त्र या पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रथम संलग्नीकरण देणे बाबत ...**

**संदर्भ :-** १. शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०२०/(१०४/२०)/ मशि-४ दिनांक ३१ जूलै, २०२०.
२. मा. सहसंचालक, पत्र क्र. शिससं/उशि/औवि/अ.शा.आस्था-३/२०२०/२१४९ दि. १७/२६-०८-२०२०.
३. प्रथम संलग्नीकरण समितीचा दिनांक २१ सप्टेंबर, २०२० रोजीचा अहवाल.

**महोदय,**

जून २०२० पासुन महाविद्यालयातील एम. एस्सी. रसायनशास्त्र या पदव्युत्तर अभ्यासक्रम नव्याने प्रथम संलग्नीकरण देणेबाबत आपल्या अर्जावर / प्रस्तावावर महाविद्यालयास भेट देऊन अहवाल सादर करण्यासाठी महाविद्यालयीन संलग्नीकरण समिती नियुक्त करण्यात आलेली होती. महाविद्यालयीन संलग्नीकरण समितीने सदरील प्रकरणी आपल्या महाविद्यालयास भेट देऊन सादर केलेल्या अहवालावर विचार करुन मा. कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या विशेष अधिकारात विद्या परिषदेच्यावतीने परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या अटींच्या अधिन राहून जून २०२० पासुन एका वर्षाकरीता संलग्नीकरणास मान्यता दिली आहे.

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११० च्या तरतुदीनुसार उपरोक्त निर्णय आपणास कळविण्यात येत असून आपणास विनंती करण्यात येते की, मा. कुलगुरु यांनी विद्या परिषदेच्यावतीने संलग्नीकरणा बावत घातलेल्या अटीचीं पुर्तता तीन महिन्यात करण्यात यावी, तसेच अटीचीं पुर्तता केल्या बाबतचा अहवाल विद्यापीठास दिनांक ०८-०१-२०२१ पर्यंत सादर करावा.**

**परिशिष्ट "अ"**

**अध्यक्ष / सचिव:-** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित, स्वा. सावरकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड, जि. बीड. यांच्याकडून जून २०२० पासुन एम.एस्सी. रसायनशास्त्र या पदव्युत्तर अभ्यासक्रमास नव्याने प्रथम संलग्नीकरण देणेबाबत संलग्नीकरण समितीने सादर केलेल्या अहवालावर विचार करुन मा. कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम कलम १२ (७) अन्वये विद्या परिषदेच्यावतीने जून २०२० पासुन एका वर्षाकरीता खालील पदव्युत्तर अभ्यासक्रमास नव्याने प्रथम संलग्नीकरण देण्यास मान्यता देण्यात येत आहे.



Scanned with OKEN Scanner

तसेच संलग्नीकरणाबाबत निर्धारीत केलेले प्राचार्य आवश्यक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, शासन निर्णयानुसार प्रयोगशाळेसाठी राखीव ठेवलेल्या निधिचा विनियोग झाल्याबाबतचे प्रमाणपत्र व समितीने दिलेल्या अटींची पुर्तता तीन महिन्यात पुर्ण करावी, नसता विद्यापीठाची समिती येऊन अटींची पुर्तता/ कार्यवाही केल्याबद्दल पाहणी करेल. तद्नंतर संलग्नीकरण टप्या टप्याने रद्द करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येईल, कृपया याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | संलग्नीकरण चालू ठेवणे | अभ्यासक्रमांचे नांव / विषय | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी विद्यार्थी प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | **एम.एस्सी. रसायनशास्त्र** प्रथम वर्ष (पदव्युत्तर) | **एम.एस्सी. रसायनशास्त्र** | एक तुकडी ३० विद्यार्थी |

**अटी:-**

१. प्रस्तावित अभ्यासक्रमासाठी (एम.एस्सी. रसायनशास्त्र प्रथम वर्ष) दोन पुर्णवेळ अर्हताप्राप्त शिक्षकांची नेमणूक करण्यात यावी.

२. अभ्यासक्रमानूसार संदर्भ ग्रंथाची संख्या वाढवण्यात यावी.

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

**प्रत महितीस्त्व व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव:-**

१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य पुणे-१. यांना माहितीस्तव अग्रेषित.
२. मा. सह संचालक, (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना महितीस्तव अग्रेषित.
३. मा. संचालक, परिक्षा व मूल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.
४. उपकुलसचिव, (आरक्षण कक्ष) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.
५. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान मंडळ मर्या, (MKCL) आय.सी.सी. ट्रेड टॉवर, ५ वा मजला, ए. विंग सेनापती बापट मार्ग, पुणे यांना माहितीस्तव अग्रेषित.
६. अधिक्षक, अव्यावसायिक विभाग, (शैक्षणिक विभाग) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.
७. अधिक्षक, पात्रता युनिट (शैक्षणिक विभाग), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीरत्व अग्रेषित.
८. समन्वयक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

स्वाक्षरित/-
उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

Swa.Sawarkar Mahavidyalaya,Beed.
Inword No. :- 833.1.
Date :- 08/10/2020



Scanned with OKEN Scanner